# श्री. पांडुरंग पवार ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित,

## दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

## निमगाव सावा, तालुका- जुन्नर, जिल्हा- पुणे.

## इतिहास विभाग

## इतिहास विभाग प्रमुख: प्रा.गायकवाड.एन.ए.

## प्रथम वर्ष कला (२०२३-२४)

## सत्र पहिले

## इतिहास (G1) (१११७१)

# प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते मौर्य काळ

**सूचना:**

येथे देण्यात आलेल्या नोट्स या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी देण्यात आल्या आहेत. हे स्वतंत्र संशोधन नाही. विविध संदर्भ ग्रंथांच्या आधारे येथे मांडणी करण्यात आली आहे. त्यापैकी निवडक संदर्भ साहित्य खालील प्रमाणे:

१) प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते मौर्य काळ: प्रा.ज्योती गणेश राऊत.
२) प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते राष्ट्रकुट काळ: डॉ.जी.बी. शहा, डॉ.एस.डी.खैरनार, प्रा.नारायण शिंदे.
३) प्राचीन भारत: प्रा.श्रीहरी रामचंद्र थोरवत, डॉ.लहू कचरू गायकवाड, प्रा.किशोर जनार्दन लांडेपाटील.
४) प्रारंभिक भारत: प्रागैतिहासिक काळ ते मौर्य काळ: प्रा.कल्याण चव्हाण.

# प्रकरण दुसरे

## हडप्पा संस्कृती : कांस्ययुगीण सभ्यता

अ) भौगोलिक विस्तार, नगररचना, व्यापार आणि धार्मिक रीतीरिवाज.

**(ब)** कला, हस्तकला आणि तांत्रिक ज्ञान : मृदभांडी, मुद्रा, मणी, प्रतिमा, मातीच्या शोभेच्या मूर्ती, धातुकाम, लिपी, अस्त.

# अ.भौगोलिक विस्तार, नगररचना, व्यापार आणि धार्मिक रीतीरिवाज–

प्रास्ताविक : शेतीचा शोध लागल्याने भटका मानव स्थिर झाला.त्यामुळे कुटूंब व समाज व्यवस्था आकाराला येऊ लागली. हळूहळू भौतिक विकासाकडे वाटचाल सुरू झाली.नवे शोध लावत त्याने आपल्या संस्कृतीस आकार दिला. या सर्व संस्कृती ताम्रपाषाण व कास्ययुग काळातील आहेत.या सर्व संस्कृतीत दगड व तांब्यापासून बनविलेल्या वस्तु मोठयाप्रमाणावर मिळतात. या काळातील माणसाला शेती पशुपालन यासह शिवणकाम विणकाम या कलाही येत होत्या. चाकाच्या शोधामुळे दळणवळणही वाढले होते. त्यातून व्यापारासही प्रोत्साहन मिळाले.व्यापार वाढीतून नोंदीसाठी लिपीची गरजही निर्मा ण होऊन लिपींचा उदय झाला. प्राचीन काळात नद्यांच्या खो-यात अशा मेसोपोटेमिया चिनी संस्कृती विकास पावल्या. मेसोपोटेमिया, चिनी या संस्कृतीप्रमाणेच सिंधु नदीच्या खो-यात हडप्पा संस्कृती विकास पावली.या संस्कृतीची माहिती पुढीलप्रमाणे...

## हडप्पा प्राचीन संस्कृतीचा शोध–:

भारतात इतिहासाचे पुरावे आर्यापासून म्हणजे इ.स.पू.१५00 पासून मिळत होते.त्यामुळे भारताचा इतिहास तेथून पुढे मांडला जात होता. परंतु १८२६ मध्ये चार्लस मॅसन या इंग्रज अधिकार्यांने भारतात प्राचीन संस्कृती नांदलेली असावी असे मत मांडले. पुढे इंग्रजकाळात १८५६ मध्ये लाहोर मुलतान रेल्वेचे काम हडप्पा परीसरात चालू होते.तेथेच जवळच्या टेकडीवर विखुर लेल्या वीटा कांटदाराने रेल्वेकामासाठी वापरल्या. या वीटा पाहून येथे प्राचीन संस्कृती होऊन गेल्याचे रेल्वेचे काम बघर्णाया बर्टन या इंग्रज बंधूंच्या लक्षात आले. भारतीय पुरातत्त्व खात्याचे पहिले सरसंचालक अलेक्झांडर कॅनिगहॅम यांनीही याच काळात १८५३ ते १८५६ अभ्यास करून येथे प्राचीन संस्कृती नांदली होते असे मत मांडत संशोधनास प्रयत्न केले.मॅसन बर्टन कॅनिगहॅम यांनी प्राचीन संस्कृतीची शक्यता वर्त वली तरी त्याबाबत ठोस संशोधन झाले नाही.त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही व त्याचा अभ्यासही झाला नाही. पुढे भारतीय पुरातत्त्व खात्याचे प्रमुख सर जॉन मार्शल यांच्या नेतृत्त्वात १९२२ मध्ये रायबहाद्दुर दयाराम सहानी यांनी हडप्पा येथे व १९२२ मध्ये लाला राखालदास बॅनर्जी यांना मोहेंजोदडो येथे केलेल्या उत्खननात प्राचीन संस्कृतीचे अवशेष मिळाले. त्यामुळे भारताला हजारो वर्षांचा इतिहास असल्याचे स्पष्ट झाले. माधवस्वरूप वत्स व सर जॉन मार्शल यांनी या संस्कृतीचा सखोल अभ्यास केला. १९२0 मध्ये डॉ.देवदत्त भांडारकर यांनी मोहेंजोदडो येथे दोन हजार वर्षापूर्वीचा बौद्ध स्तूप व विहार शोधला.पण त्यावेळी तेथेच खाली अतीप्राचीन संस्कृतीचे अवशेष असल्याचे माहित नव्हते. १९२२

मध्ये राखालदास बॅनर्जी यांनी तेथे अधिक उत्खनन करून मोहेंजोद डोचा शोध लावला . तेथेच मिळालेल्या दगडी पात्यावरून ही हडप्पा मोहेंजोदडो संस्कृती प्रागैतिहासिक संस्कृती असल्याचे लक्षात आले .

## संस्कृतीचे नामकरण ः सिंधू संस्कृती, सिंधू सरस्वती संस्कृती, हडप्पा संस्कृती–

१९२१ मध्ये सुरू झालेल्या उत्खननामुळे भारताला प्राचीन संस्कृती असल्याचे स्पष्ट झाले . सुरूवातीला या संस्कृतीची जी ठिकाणे सापडली ती प्रामुख्याने सिंधु नदी व तीच्या उपनदयांच्या खो-यात होती . म्हणून या संस्कृतीस सिंधू संस्कृती म्हणण्यात येऊ लागले . पण पुढे या संस्कृतीतील अनेक शहरांचा शोध लागला . सरस्वती नदीच्या खो-यात अनेक ठिकाणे सापडल्याने या संस्कृतीस सिंधु सरस्वती संस्कृती म्हणण्यात येऊ लागले . पण या संस्कृतीत सापडलेली स्थळे सिंधू सरस्वती या दोन नदयांशिवाय इतर अनेक नदयांच्या खो-यात विखुरली होती . ती सिंधू सरस्वती नदी पासून खुप दुरही होती व संख्येनेही जास्त होती . त्यामुळे अशा एखादया संस्कृतीला नाव देताना पहिल्यांदा जे ठिकाण सापडले त्याचे नाव देण्याची पद्धत आहे . त्यानुसार या संस्कृतीचे पहिले उत्खनन हडप्पा येथे झाल्याने या संस्कृतीस हडप्पा संस्कृती असे नाव देण्यात आले .

## हडप्पा संस्कृतीचे लोक कोण होते ?

हडप्पा या प्राचीन संस्कृतीचा शोध लागल्यानंतर एवढी वैभवशाली संस्कृती निर्माण करणारे लोक कोण होते यावरही विचार व संशोधन सुरू झाले . हडप्पा संस्कृतीचे लोक कोण कुठले होते याविषयी संशोधकांमध्ये मतभेद आहेत . त्यात प्रामुख्याने दोन विचार प्रवाह आहेत .

१ . हडप्पा संस्कृतीचे लोक भारताबाहेरून आले .

२ . हडप्पा संस्कृतीचे लोक भारतातीलच होते .

मार्शल व्हीलर चाइल्ड डी . डी . कोसंबी यांच्या मते सुमेरीयन संस्कृतीच्या लोकांनी हडप्पा संस्कृती निर्माण केली . तर काही अभ्यासक या संस्कृतीला भारतीय लोकांनीच निर्माण केले असे मानतात त्यातही दोन प्रवाह आहेत . एक ही संस्कृती आर्यांनी निर्माण केली असे टी . एन . रामचंद्र मानतात तर राखालदास बॅनर्जी या संस्कृतीची निर्मिती द्रवीड लोकांनी केले असे मानतात .

## हडप्पा संस्कृतीचा कालखंड-:

हडप्पा संस्कृतीच्या निश्चित काळाबाबत मतभेद आहेत. पुरातत्त्वीय अवशेषांच्या आधारावर कालखंड निश्चितीचा प्रयत्न झाला आहे. प्राप्त वस्तु व धातूच्याआधारे ही कास्ययुगीन संस्कृती सुमेरीयन संस्कृतीच्या समकालीन होती. सर मार्शल यांनी या संस्कृतीचा उत्कर्ष काळ इ.पू. ३१00 ते इ.पू. २५00 व ती इ.पू. ३७५0 पूवी१ची असल्याचे मांडले आहे. हडप्पा संस्कृतीच्या उत्खननात भाग घेतलेल्या सर मॉटि१मर व्हीलर यांनी या संस्कृतीचा कालखंड इ.पू. २५00 ते इ.पू. १५00 मानला आहे. तर डी. पी. चौधरी यांच्यामते इ.पू. २३00 ते इ.पू. १७५0 ३कार्बन १४ हा हडप्पा संस्कृतीचा काळ आहे. साधारणतः इ.पू. २५00 ते इ.पू. ि७00 हा काळ मानला जातो.

## अ. भौगोलिक विस्तार-:

इतर समकालीन संस्कृतीपेक्षा हडप्पा संस्कृतीचा भौगोलिक विस्तार फार मोठा होता. आजच्या अफगाणीस्तान, पाकिस्तान व भारत या तीन देशात हडप्पा संस्कृतीचा विस्तार होता. आजच्या पाकिस्तानातील पंजाब सिंध व बलुचिस्तान मध्ये ही स्थळे मिळाली आहेत. तर भारतातील जम्मू काश्मिर पंजाब हरियाणा पश्चिमी उत्तर प्रदेश राजथान गुजरात व महाराष्ट्र या सात राज्यात ही संस्कृती पसरली होती. याशिवाय अफगाणीस्तानच्या अमुदर्या नदीच्या खो-यात ही शौंतुगाई व मुंदगाग या दोन ठिकाणी हडप्पा संस्कृतीच्या वसाहती मिळाल्या आहेत. सिंधु व सरस्वती यासह अनेक नदयांच्या खो-यात या संस्कृतीचा विस्तार झाला होता. हडप्पा संस्कृती उत्तरेला अफगाणीस्तानातील शोर्तुगाई व भारतात जम्मूतील मांडा पासून दक्षिणेला महाराष्ट्रातील दायमाबाद पर्यं त १४00 कि.मी. तर पूर्वेला उत्तर प्रदेशातील मेरठ मधील आलमगीरपूरपासून पश्चिमेला पाकिस्तानच्या बलुचिस्थानमधील सुतकाजेन्दोरपर्यंत १६00 कि.मी. पसरली होती. या संस्कृतीने १0३ दशलक्ष चौरस मैलाचा प्रदेश व्यापला होता. ही हडप्पा संस्कृती तत्कालीन संस्कृतीतील सर्वात व्यापक संस्कृती होती. हडप्पा संस्कृतीची या विस्तृत प्रदेशात अफगाणीस्तानात दोन पाकिस्तानात सुमारे पाचशे व भारतात पंधराशे अशी २000 पेक्षा जास्त ठिकाणे उत्खननात मिळाली आहेत. यात अनेक गावे व शहरांचा समावेश होतो. दोन हेक्टरमध्ये पसरलेल्या गावांपासून दीडशे दोनशे हेक्टर क्षेत्रफळ असणारी शहरे या संस्कृतीत होती. या संस्कृतीच्या काळात राजस्थानातील पर्जन्यमान २४ इंच चांगले होते घग्गर नदी सरस्वती त्यावेळी दुथडी भरून वाहत होती. हा परीसर सुपिक व राहण्यास उत्तम होता. त्यामुळे यातील अनेक स्थळे राजस्थानात सापडतात.

हडप्पा संस्कृतीतील प्रमुख वसाहती प्रमुख नगर हडप्पा संस्कृतीचा शोध लागल्यानंतर अनेक ठिकाणी संशोधकांनी उत्खनन केले. त्यांना अनेक वसाहतींचा शोध लागला. या प्रमुख शहरांची माहिती पुढीलप्रमाणे . . .

## १. हडप्पा– :

हडप्पा पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील मोंटगोमेरी जिल्ह्यात रावी नदीच्या काठी हडप्पा वसले आहे. १९२१ मध्ये रावबहादुर दयाराम सहानी यांनी येथे उत्खनन करून या शहराचा शोध लावला. या संस्कृतीचे हे सापडलेले पहिले शहर असल्याने या संस्कृतीस या शहराच्या नावावरून हडप्पा संस्कृती म्हणण्यात येते. माधवस्वरूप वत्स यांनीही येथे मोठे संशोधन व उत्खनन केले. येथे धान्य कोठार मिळाले आहे. कोठाराच्या दक्षिणेस धान्य सोडण्यासाठी गोल चबुतरे ही होते. येथे सौदर्यप्रसाधन पेटी व कास्यंदर्पण ही मिळाले. गरूड चित्रीत मुद्रा व गाढवाचे हाडही येथे मिळाले आहे.

## २. मोहेंजोदडो– :

मोहेंजोदारो पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील लारकाना जिल्ह्यात सिंधू नदीच्या काठी मोहेजोदडो वसले आहे. मोहजोदडो शब्दाचा अर्थ मृतांची टेकडी असा होतो. देवदत्त भांडारकर यांनी १९२० मध्ये शोधलेल्या बौद्ध स्तुपाखाली १९२२ मध्ये राखालदास बॅनर्जी यांनी मोहेंजोदडो या सुनियोजित तटबंदी असलेल्या व पक्क्या भाजलेल्या वीटांनी बांधकाम केलेल्या शहराचा शोध लावला. येथे धान्यकोठार, सभागार, महास्नानगृह या प्रमुख वास्तु मिळाल्या. तसेच मातृदेवता, कास्याची नर्तकीची, दाढीवाल्या पुर्जायाची व पशुपतीची मूर्ती मिळाली आहे.

## ३. लोथल– :

भारतील गुजरात राज्यात अहमदाबाद जिल्ह्यात भोगावा नदीच्या काठी लोथल वसले आहे. डॉ. रंगनाथ राव यांनी १९५७ मध्ये या शहराचा शोध लावला. लोथल येथे ७१० फुट लांब १२० फुट रूंद गोदीचे अवशेष मिळाल्याने या बंदराला जगातील सर्वात जुने बंदर मानले जाते. येथे फारसची दुतोंडया राक्षसाची मुद्रा मिळाल्याने येथून परदेशाशी व्यापार चालत होता यास पुष्टी मिळते. हस्तीदंती व कास्याची सुई, अग्निवेदीका, घोडयाची मुर्ती व चक्कीचे पुरावे येथे मिळाले आहेत. याशिवाय येथे तांदळाचेही अवशेष मिळाले आहेत.

## ४ . कालीबंगन— :

भारतातील राजस्थान राज्यात श्रीगंगानगर जिल्ह्यात हनुमानगढ येथे घग्गर नदीच्या काठी कालीबंगन वसले आहे . अमलानंद घोष यांनी १९५३ मध्ये या शहराचा शोध लावला व १९६० मध्ये ब्रजवासीलाल यांनी उत्खनन केले . येथे हडप्पा संस्कृतीबरोबरच हडप्पापूर्व संस्कृतीचेही अवशेष मिळाले आहेत . कालीबंगन शब्दाचा अर्थ काळया रंगाच्या बांगडया असा होतो . येथे आपल्याला नांगरलेल्या शेताचे प्रमाण मिळाले आहे . येथे एकाचवेळी दोन पिके ३जवस व मोहरी ´ ही घेतली गेली . अग्निकुंड¸ कापडात गुंडाळलेला वस्तरा¸ शंख¸ काच व मातीच्या बांगडया अलंकृत वीटा¸ बैलाची मूर्ती व बैलाच्या हाडाचे अवशेष येथे मिळाले आहेत .

## ५ . धोलवीरा— :

धोलव्हिरा भारतील गुजरात राज्यात कच्छ भागात १९८९ मध्ये धोलवीरा वसाहतीचा शोध आर . बी . बीश्त यांनी लावला . येथे हडप्पा प्रमाणे शेकडो शिक्के मिळाले . तसेच ३५ सेमी उंचीची दगडी पाषाणाची मानवी मुर्ती सापडली आहे . येथे इतरत्र न मिळालेल्या स्टेडीयमचे अवशेष बघायला मिळातात . २०२१ मध्ये हया ठिकाणाला युनोस्को तर्फे जागतिक वारसा स्थळ म्हणुन मान्यता देण्यात आली आहे .

## ६ . सुत्काजेन्दोर— :

पाकिस्तानातील कराचीपासून ३०० मैल पश्चिमेस सुत्काजेन्दोर येथे १९२७ मध्ये स्टाईन यांनी व १९६२ मध्ये जॉर्ज डेल्स यांनी उत्खनन केले . त्यात येथे बंदर व किल्ल्याचे अवशेष मिळाले . येथे मणी बनविण्याच्या कारखान्याचेही अवशेष मिळाले . या शिवाय चन्हुदारो, रंगपूर, सुरकोटडा, बनावली, आलमगिरपूर, रोजदी, दायमाबाद अशा अनेक ठिकाणी हडप्पा संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत .

## अ. नगररचना-:

हडप्पा संस्कृती नागर संस्कृती होती.या संस्कृतीतील नगरांचा इतिहास १.हडप्पापूर्व संस्कृती २.नागरी हडप्पा संस्कृती व ३.उत्तर हडप्पा संस्कृती अशा तीन कालखंडात विभागला आहे. हडप्पा पूर्व गावे विकसित होत नगरे निर्माण झाली. छोटया वस्तीपासून मोठया नगरांपर्यंतच्या वसाहती आपणास उत्खनात मिळाल्या आहेत. या उत्खननाच्या आधारे हडप्पाकालीन नगररचना लक्षात येते. हडप्पा नगररचना सुव्यवस्थित व नियोजनबद्ध होती. हडप्पा संस्कृतीतील लोकांनी नगररचनेकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसते. नगररचना हे हडप्पा संस्कृतीचे महत्त्वाचे वैशिष्टय मानले जाते. इतर कोणत्याही संस्कृतीपेक्षा हडप्पा नगरे उत्कृष्ट ठरतात.या नगररचनेची काही वैशिष्टये होती ती पुढीलप्रमाणे

## हडप्पा संस्कृतीतील नगररचना व तीची वैशिष्टये-:

### १. नगराचे विभाग-:

हडप्पा संस्कृतीतील नगरे प्रामुख्याने दोन भागात विभागलेली दिसतात.नगराच्या पश्चिमेला गढी असे.गढीला भक्कम तटबंदी व बुरूज असत.तर पूर्वेस नागरिकांची घरे असत.गढीचा भाग राजकीयदृष्टया महत्त्वपूर्ण असावा.तेथून नगराचे प्रशासन चालविले जात असावे.

### २. शहरांना तटबंदी-:

हडप्पा संस्कृतीच्या अनेक नगरांचे आज उत्खनन झाले आहे.त्यापैकी अनेक नगरांना सरंक्षणासाठी तटबंदी व खंदक होते.त्याचे अवशेष मिळाले आहेत.त्यावरून हडप्पा संस्कृतीतील लोकांनी आपल्या नगरांची विशेष काळजी घेतल्याचे दिसते.

### ३.गृहरचना-:

हडप्पा संस्कृतीतील बांधकामे नैसर्गिक आपत्तींचा सामना करता येतील अशी होती.हडप्पा संस्कृतीतील घरे रस्त्याच्या कडेने सरळ ओळीत व सुंदरतेपेक्षा सुरक्षेचा विचार करून बांधलेली असत. बहुतांशी घरे पक्की व दुमजली होती.घरात पाच सहा खोल्या असत.काही घरात तीस खोल्याही आढळल्या आहेत.घरबांधणीसाठी पक्क्या भाजलेल्या ठराविक मापाच्या वीटा वापरल्या जात.घराच्या मध्यभागी चौक व चारी बाजूंनी राहण्यासाठी खोल्या अशी चौसोपी घरे होती.वरच्या मजल्यावर जाण्यासाठी घराबाहेरून अरूंद व उंच जीना असे.घरात चांगला प्रकाश येईल व हवा खेळती राहिल याची काळजी बांधकाम करताना घेतलेली असे.घराच्या भिंतींना दोन्हीबाजूने गिलावा

केलेला असे . विहिर एका बाजूस उतारासाह फरसबंदी असलेली स्नानगृह सांडपाणी वाहून नेणारी नाली सर्व घरात असत . घराचे मुख्य दार मुख्यरस्त्याला न ठेवता उपस्त्यास ठेवत . मुख्य रस्त्याच्या बाजूने खिडक्याही नसत . हडप्पा मोहेंजोदडो येथे कामगार वस्त्यांचे अवशेष ाही मिळाले आहेत . ही घरे दोन खोल्यांची होती .


## ४ . रस्ते- :

हडप्पा संस्कृतीच्या नगरातील रस्ते एकमेकास काटकोनात छेदतात . नगरातील मुख्य रस्ता नऊ फुटांपासून चौतीस फुटांपर्यंत रूंद होते . तर नऊ ते बारा फुटांचे उपरस्ते असत . काही ठिकाणी अगदी चार फुट रूंदीचे रस्तेही दिसतात . मोठया रस्त्यांच्या बाजूला मोकळी जागा ही असे . रस्त्याच्या काही अंतरावर कचरा टाकण्यासाठी खड्डेही दिसतात . काही रस्ते पक्क्या वीटांनी बांधलेले असत . काही रस्त्यांच्या दोन्ही बाजूस दिवे लावण्याची असलेली सोय हे या संस्कृतीतील रस्त्यांचे वैशिष्टय आहे .

## ५ . सांडपाण्याची व्यवस्था- :

हडप्पा संस्कृतीचे हे फार महत्त्वाचे वैशिष्टय आहे . रस्त्यावर कचरा असू नये यासाठी जागोजागी खड्डे असत यावरून स्वच्छतेविषयी जागरूकता लक्षात येते . ही स्वच्छताविषयक जाणीव तेथील सांडपाणी व्यवस्थापन पाहता अधिक स्पष्ट होते . हडप्पा व मोहेंजोदडो येथे भूयारी गटारांची व्यवस्था होती . शहरातील मोठया व छोट या रस्त्यांच्या बाजूने गटारे होती . ती दगड व वीटांनी बांधलेली असत . माती चुना व जिप्सम वापरून ती पक्की केली असत . तसेच ही गटारे भूमिगत असल्याने दुर्गंथी पसरत नसे . घरातील स्नानगृह स्वच्छतागृहाचे पाणी नळीद्वारे मुख्य गटारांमध्ये सोडून व्यवस्थित नगराबाहेर नेले जात असे . या सर्व गटारांना ठराविक अम्तरावर काही कालावधीनंतर सफाई करण्यासाठी झाकण ठेवलेले असे . सांडपाण्याची इतकी उत्तम व्यवस्था तत्कालीन एकाही संस्कृतीत दिसत नाही .

## ६ . महास्नानगृह– :



मोहेंजोदडो येथे उत्खननात भव्य स्नानगृह मिळाले आहे . या स्नानगृहाची लांबी ५५ मीटर व रूंदी ३३ मीटर आहे . त्याच्या मध्यभागी एक पोहण्याचा तलाव असून त्याची लांबी १२ मीटर व रूंदी ७ मीटर तर खोली अडीच मीटर आहे . या तलावाच्या चारही बाजूने व्हरांडे आहेत . तलावात उतरण्यासाठी पार्यायाही आहेत . काही खोल्या व सज्जेही आहेत . ते कदाचित कपडे बदलण्यासाठी असावेत . पाणी झिरपू नये यासाठी तलावाची काम पक्क्या वीटांमध्ये केले आहे . शिवाय चुन्याचा लेपही दिला होता . तलावात पाणी भरण्यासाठी बाजुला एक विहिरही होती . तर तलावातील घाण पाणी काढून टाकण्याचीही व्यवस्था होती . या स्नानगृहाच्या बाजूस लहान लहान स्नानगृहेही आढळली आहेत . या स्नानगृहाचा उपयोग धार्मिक समारंभासाठी करण्यात येत असावा असा अंदाज आहे .

## ७ . धान्याची कोठारे – :

हडप्पा मोहेंजोद डो व कालीबंगन येथे धान्याची कोठारे सापडली आहेत . मार्टीमन व्हीलर या कोठारांना अन्नागार म्हणतात . धान्य कोठारे ही या संस्कृतीची खास ओळख मानली जाते . हडप्पा येथील कोठार ५ मीटर लांब व ४ मीटर रूंद आहे . त्यात आत धान्य ठेवण्यासाठी सहा विभाग होते . त्यावेळी कर धान्यरूपात घेतला जात असावा . कोठारात धान्य खराब होऊ नये म्हणून बांधकामात हवा खेळती राहण्याची काळजी घेतली होती . कोठाराचे छत बांबूपासून बनविलेले असावे . धान्य उतरवुन घेण्यासाठी कट्टेही होते . धान्यकांडण्याचे ओटे ही जवळ होते . या ठिकाणी

धान्याचे अवशेष मिळाले आहेत.कोठारात काम करणा-या लोकांसाठी शेजारीच घरेही हडप्पा येथे अशी चौदा घर असत.

## ८.राजप्रासाद-:

मोहेंजोदडो येथे घराप्रमाणे मोठे प्रासादही सापडले. शहराच्या उत्तरेला पूर्व पश्चिम रस्त्यावर पाच फुट रूंदीच्या भिंती असलेली २४२ फुट लांब व १२ फुट रूंद इमारत मिळाली. हा राजप्रासाद असावा किंवा सरकारी कामकाजाचे ठिकाण असावे. अधिकारी वर्ग तेथे राहत असावा.

## ९.गोदी-:

लोथल येथे प्राचीन गोदीचे अवशेष मिळाले आहेत. हडप्पा संस्कृती व्यापारासाठी प्रसिद्ध होती. २३७ मीटर लांब व ४0 मीटर रूंद गोदीचे अवशेष मिळाले आहेत. गोदीच्या सभोवरी पाच मीटर उंचीच्या भिंती होत्या. समुद्राचे पाणी आत घेण्यासाठी व जादा पाणी बाहेर काढण्यासाठी दोन नाल्यांची व्यवस्था होती.

## अ.व्यापार-:

हडप्पा संस्कृतीत अनेक नगरांचा शोध लागला आहे. हडप्पा मोहेंजोद डो ही नगरे व्यापारी नगरे होती. नागरी संस्कृती असल्याने साहजिकच ती व्यापारास पोषक होती. या संस्कृतीतील नगरे आपसात व्यापारी मार्गांनी जोडलेली होती. अंतर्गत व्यापाराबरोबर हडप्पा संस्कृतीचा बहिर्गत व्यापारही मोठयाप्रमाणावर वाढला होता. शेतीतील अतिरिक्त उत्पादनामुळे आलेली सुबत्ता, चाकामुळे गतिमान झालेली वाहतूक व वाहतूकीसाठी प्राण्यांचा वापर तसेच विविध विनिमय माध्यमांची होऊ लागलेली उपलब्धता यामुळे हडप्पा संस्कृतीत व्यापाराची भरभराट झालेली आपणास दिसते.

## १.शेती विकासातून व्यापाराला चालना ः

हडप्पा संस्कृतीत अगदी सुरूवातीस धान्योत्पादन फार नसावे. पेरणीसाठी टोकदार काठी वापरली जात असे. त्यामुळे उत्पादनही कमी असणार. कुटुंबांची गरज भागवण्या इतपर हे उत्पादन असावे. हडप्पा संस्कृतीच्या पहिल्या टप्प्यातच शेतीसाठी बैलाचा वापर सुरू झाला.नांगर व बैल यांच्या वापरामुळे शेतीचे उत्पादन वाढले. शेती लोकांच्या उपजिवीकेचा मुख्य आधार

झाली .शेतीमुळे स्थिरता व समृद्धता आली .हवामानही पुरक होते . गहू जव बाजरी घेवडा वाटाणा तीळ राई जवस कापूस उस पिके घेतली जाऊ लागली .अन्नधान्याबरोबर दुध फळे व मांस यांचाही आहारात समावेश असे .मासांसाठी पशुपालन करत . गाय बैल म्हैस डुक्कर गाढव उंट कु प्राणी पाळले जात . हे अतिरिक्त उत्पादन देऊन गरजेच्या वस्तु मिळवता येणे शक्य झाले .त्यातून वाढत्या उत्पादनामुळे त्याचा व्यापार सुरू झाला . धान्य हेच विनिमयाचे माध्यम झाले .

## २ .मातीची भांडी व कापड ः




स्त्रिया पूर्वी हाताने मातीची भांडी तयार करत .चाकाचा शोध लागल्याने भांडी अधिक प्रमाणात व तुलनेने सुबक बनली . शेतीत विविध पिकांसह कापूस उत्पादनही होऊ लागले . सिंधू नदीच्या खोयात प्रथमतः कापूस उत्पादन होऊ लागले . त्यामुळे ग्रीक लोक कापसाला सिंदॉन म्हणत .कापसाच्या उत्पादनातून कापड व्यवसाय उदयास आला . सुती कापडाचा वापर येथूनच झाला असावा .घरातच सूत कातले जात असावे . सुतकताई व लपेटा करण्याच्या नळया उत्खननात मिळाल्या आहेत . येथील सूती कापडास बाहेर च्या जगतातून मोठी मागणी होती . तर इजिप्त मध्ये हडप्पाहून मलमल आयात केली जात असे .

## ३ . व्यापार अनुकूल धोरण ः

हडप्पा संस्कृतीत नगरांमध्ये एक भाग कारखान्यांसाठी स्वतं विभाग राखीव होता. औद्योगिक वसाहतींचीही रचना दिसते. चहुन्दारो ही अशीच वसाहत आहे. गुजरात मधील नगरे व्यापार सोयीने वसविलेली दिसतात. व्यापार विस्तारासाठी रस्त्यांचे जाळे¸ खरेदी विक्रीसाठी पेठाची स्थापना व व्यवहार सुलभतेसाठी एकाच प्रकारची वजने मापे यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसते. हयातून व्यापार वाढीस चालना मिळाली.

## ४ . विनिमय माध्यम ः

हडप्पा संस्कृतीत व्यापारी देवघेव करण्यासाठी विनिमय माध्यम म्हणून कशाचा वापर केला जात असे याविषयी विविध संशोधकांनी मते नोंदविली आहेत. हडप्पा येथे एका चांदीच्या करंडयात काही दागिन्यांबरोबर १२ चांदीचे तुकडे मिळाले. काही संशोधक त्यास त्यावेळची नाणी मानतात. परंतु त्यांना रूढ अर्थाने नाणी म्हणता येणार नाही. साधारणपणे तेथे वस्तुविनिमय पद्धती रूढ असावी असा तर्क करावा लागतो.

## ५ . वजने मापे ः

हडप्पा संस्कृतीत वस्तुविनिमय पद्धती होती. व्यवहारासाठी दगडी वजने व तांबे कासे यांचे काटे वापरले जात. वजने दशमान पद्धतीची होती. खोटी वजने वापरली जात नसत. लोथल येथील उत्खननात विशिष्ट दगडांपासून तयार केलेला वजनांचा एक संपूर्ण संच मिळाला आहे. १.८३ ग्रॅम पासून १३७ ग्रॅम पर्यंतची वजने मिळाली आहेत. लांबीचे माप दशांश पद्धतीचे आहे. लोथल येथे मोजमापाची हस्तीदंती पट्टी मिळाली आहे.

## ६ . वाहतूक साधने ः

शेतीच्या विकासाबरोबर पशुपालनासही चालना मिळाली. या पशुंचा विविध कारणांसाठी उपयोग करण्याची कला हडप्पा संस्कृतीतील लोकांना अवगत झाली. त्याचा वाहतूकीचा वेग वाढण्यास मदत झाली. चाकामुळे व प्राण्यांमुळे वाहतुक वेगाने होऊ लागल्याने व्यापार वाढीस अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. देशातंर्गत वाहतुकीसाठी बैलगाडी वापरात होती. गाढव, उंट, हत्ती, घोडा यांचाही वापर होत असावा. एका मुद्रेवर जहाजाचे मिळालेले चित्र व लोथलची गोदी यावरून बहिर्ग

त व्यापारासाठी जहाजांचा वापर होत असावा. लोथलची गोदी ही जगातील सर्वात प्राचीन गोदी मानली जाते. थोडक्यात वाहतूक साधनांच्या उपलब्धतेमुळे व्यापारास चालना मिळाली.

## ७. अंतर्गत देशी व्यापार ः

हडप्पा संस्कृतीकाळात देशातंर्गत व्यापार भरभराटीस आला होता. म्हैसूरहून व कोलारच्या नवपाषाणकालीन संस्कृतीच्या लोकांकडून सोने घेतले जाई. चेन्नईतून व राजस्थानतातील खत्री खाणीतून तांबे मिळत असे. जोधपुरच्या ताम्र उत्पादकांशीही हडप्पा लोकांचा संबंध होता. अजमेरहून शिसे काश्मीर व काठियावाडमधून मौल्यवान दगड मिळत. हडप्पा लोकांना दागिण्यांची हौस होती. त्यामुळे साहजिकच या वस्तू व त्यांच्या व्यापारास चालन मिळाली. भारतभर इतर संस्कृतींशी हडप्पा संस्कृतीचा व्यापार चालत असे. पिकलीहाल येथे हडप्पा संस्कृतीतील वस्तू मिळाल्या आहेत. अंतर्गत देशी व्यापाराच्या सोयीसाठी अनेक मार्ग विससित झाले होते. वाहतूकीसाठी बैल गाढव हत्ती या प्राण्यांचा उपयोग केला जाई.

## ८. आयात व निर्यात ः

हडप्पा संस्कृतीतील लोक बाहेरील संस्कृतीच्या लोकांशीही संपर्कात होते. त्यांच्याशी त्यांचा व्यापार चालत असे. हा व्यापार जमीनीबरोबर समुद्रमार्गे ही होत असे. उत्तम टिकाऊ जहाजे तयार केली जात असावीत. लोथल बंदरात गोदीचे अवशेष मिळाले आहेत. तेथून अनेक वस्तूंची निर्यात व आयात केली जात असे. मेसोपोटेमियाच्या पहिला सार्गन राजाच्या लेखात या व्यापाराचा उल्लेख आहे. मध्य आशिया अफगाणिस्तान बहारीन ओमान इराण बलुचिस्तानचा किनारा ते हडप्पा असा व्यापार चालत असे. मेसोपोटेमियातील अनेक ठिकाणी हडप्पा संस्कृतीच्या विविध वस्तू सापडल्या आहेत. तर हडप्पा नगरांच्या उत्खननात मेसोपोटेमियातील अनेक वस्तू मिळाल्या आहेत.

हडप्पा संस्कृतीचे लोक सोने चांदी लोकर या वस्तू आयात करत. तर हडप्पातून तांबे हस्तीदंताच्या वस्तू मातीची भांडी गोमेद मणी कापड चामडयाच्या वस्तू तसेच माकडे मोर हे प्राणी मेसोपोटेमियात निर्यात केले जात. अफगाणिस्तानच्या बदकशान प्रांतातील शोर्तुगाय ही हडप्पा संस्कृतीची वसाहत होती. तेथे इंद्रनील दगडाच्या खाणी आहेत. या दगडापासून तयार केलेल्या वस्तूंना मेसोपोटेमियात मोठी मागणी होती. इजिप्तच्या राजघराण्यातील व्यक्तींच्या मृत्यूनंतर त्यांना निळया कापडात गुंडाळले जाई. निळया कापडासाठी लागणारी निळ हडप्पा संस्कृतीतील लोक निर्यात करत.

## हडप्पाकालीन धार्मिक जीवन :

हडप्पा संस्कृतीच्या नगरांतून कसल्याही प्रकारचे मंदिर मिळत नाही. कालीबंगनला मात्र एक यज्ञवेदी मिळाली आहे. हडप्पा संस्कृतीकालीन धार्मिक स्थितीविषयी आपल्याला प्रामुख्याने मुद्रा मूर्ती आणि दगडाच्या प्रतिमा यांच्यावर अवलंबून राहावे लागत. हडप्पा संस्कृतीची लिपी अजून वाचता न आल्याने आपल्याला त्यांच्या धार्मिक कल्पनांविषयी विधान करणे अवघड आहे. तरी एकंदर विचार करता उत्खननात मिळालेल्या विविध पुराव्यांवरून आपण त्यांच्या धार्मिक जीवना विषयी थोडया फार प्रमाणात अंदाज बांधु शकतो.

## मातृदेवीची पूजा :

हडप्पा संस्कृतीच्या मोहंजोदाडो हडप्पा व बनवली या स्थळात प्रामुख्याने या मुर्ती सापडलेल्या आहेत. हया मुर्ती मातीपासुन बनवलेल्या आहेत. त्यांच्यावर अनेक मातीपासुन बनवलेल्या माळा व रत्ने लावलेली आहेत. काही मुर्तीवर दोन्हीबाजुला दिवे चिटकवलेल आहेत. हडप्पा या ठिकाणी एक नग्न नारीची मुर्ती मिळाली आहे. मुद्रांवर देखील अनेक स्त्री देवतांची चित्रे रेखाटलेली आहे. मातृदेवीला प्रसन्न करण्यासाठी तिची पुजा केली जात असे.

## लिंगपुजा :

उत्खननात अनेक ठिकाणी लिंग व योनीच्या आकृतीशी मिळत्याजुळत्या प्रतिकृती मिळाल्या आहे. हडप्पावासी लिंग पूजा करायचे असे विधान सर जॉन मार्शल यांनी केले होते. परंतु जॅर्ज डेल्स यांनी नंतर या प्रतिकृतीचा इतर कारणांसाठी उपयेग होत असावा असा सिद्धांत मांडला. काही लिंगाना छिद्र देखील अढळतात बहुदा लोक दोरा बांधुन ती गळयात सुद्धा घालत असे.

## पशुपतीची पुजा :

मोहंजोदाडो या ठिकाणी पद्मासन घालुन बसलेली एका योग्याची प्रतिमा असणारी मुद्रा मिळाली आहे. त्याच्या उजव्या बाजुला वाघ आणि हत्ती तर डाव्या बाजूला गेंडा आणि म्हैस आहेत तर त्याच्या समोर एक हरीण आहे. त्याच्या शिरावर त्रिशुलाचे आवरण आहे. याला तीन मुखे आहेत. मार्शल या प्रतिमेला 'रूद्रशिव'म्हणतो ज्याला त्रिमुख पशुपती योगेश्वर किंवा महायोगी म्हटले जाते.



## बळी देण्याची प्रथा ः

हडप्पा या ठिकाणी मिळालेल्या मूर्तीच्या हात समोर करून एका स्त्रीची मूर्ती आहे तर दुसरीकडे चाक हातात घेऊन एक माणुस उभा आहो. यावरून हे स्पष्ट होते की या ठिकाणी नरबळीची प्रथा प्रचलित होती. त्याच प्रमाणे एक माणुस झाडाखाली बर्कयाला घेऊन उभा आहे. यावरून ही स्पष्ट होते बळीप्रथा त्यावेळेस होती.

## वृक्षपूजा ः

उत्खननात अशा अनेक मुद्रा मिळाल्या आहेत की ज्यांच्यावर वृक्षांच्या प्रतिमा आहेत. मोहेंजोदडो ताा ठिकाणी मिळालेल्या मुद्रेवर संयुक्त पशूच्या डोक्यावर पिंपळाची पााने आहोत. या मुद्रेवर खजुर व लिंब या वृक्षांची झाडे आहेत. एका मुद्रेवर मातृदेवाची प्रतिमा आहे. तिच्या डोक्यावर शिंगे आहेत. ही मातृदेवी पिंपळाच्या झाडात उभी आहे. शिंगांतुन वृक्षाची पाने निघताना दिसत आहेत. तिच्यासमोर शिंगे असणारा एक भक्त गुडघ्यावर बसुन खाली झुकलेला आहे.

## यज्ञवेदी ः

लोथल आणि कालीबंगन याठिकाणी अग्नीकुंडे मिळाले आहेत. लोथलला सुद्धा असा एक कुंड मिळाला आहे. यामध्ये प्राण्यांची हाडे मिळाली आहे. कालीबंगनला एका विहिरीच्या जवळ अग्निकुंड मिळाले आहे. यावरून ही बाब स्पष्ट होत की अग्नीला पवित्रा मानले जायचे त्याचप्रमाणे पशुबळीसुद्धा दिले जात असत.



## प्राणी पूजा ः

हडप्पा संस्कृतीत बैलाला फार महत्त्व होते. हडप्पाच्या अनेक मुद्रांवर तो दिसतो. तसेच अनेक प्राणी जसे साप, रेडा, हत्ती, गेंडा, वाघ इ. प्राणी आपल्याला मुद्रांवर बघायला मिळतात. काही ठिकाणी बेलावर नक्षी काढलेली दिसते यावरून बैलाची पुजा केली जात असावी असे वाटते.

अंत्यविधीचे संस्कार

हडप्पा संश्कृतीमध्ये तीन पद्धतीत अंत्यसंस्कार केले जात असावे. मृत व्यक्तीस पुरले जात असे. पुरताना डोके उत्तरेकडे व पाय दक्षिणेकडे केले जात असत. पुरताना मृत देहाबरोबर काही वस्तूसुद्धा ठेवल्या जात असत. मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे शरीर पशु-प्राण्यांना खाण्यासाठी ठेवले जात असे आणि राहिलेला देह पुरला जात असे. एकूणच त्यांच्या अंत्यविधी प्रसंगावरून असे लक्षात येते की, त्या लोकांमध्ये धार्मिक अंधविश्वास प्रचलित होता.


## कला हस्तकला आणि तंत्रज्ञान ः

हडप्पा संस्कृती कांस्य युगातील होती. हडप्पन लोक दगडांची हत्यारे व उपकरणे वापरीट परंतु कांस्याचे उत्पादन व त्याचा वापर यांच्याशी त्यांचा चांगला परिचय होता. सामान्यतः जस्त व तांबे मिसळुन कासार लोह ार कांस्य बनवत. या दोन्हीपैकी एक ही धातू सहजरित्या हडप्पन लोकांना उपलब्ध होत नसल्यामूळे कांस्य धातूची हत्यारे हडप्पा येथे मोठया संख्येने सापडली नाही. अशुध्द स्वरूपात ताम्र राजस्थानातील खत्री क्षेत्रातील खाणीत उपलब्ध होते तर जस्त हजरीबाग व बस्तर येथे बराच खटाटोप करून अफगणिस्तानातुन आणले जात असे.हडप्पा येथे सापडर्णाया हत्यारांमध्ये जस्ताचे प्रमाण कमी प्रमाणात होते. कांस्य वस्तु बनवणारा एक कारागिरांचा मोठा गट हडप्पन समाजाचा एक महत्त्वाचा भाग बनला होता. हे कारागिर प्रतिमा भांडी तसेच कु-हाडी, करवती, चाकु व भाले अशी हत्यारे व उपकरणे ही बनवत असत. मोहंजोदाडो येथील उत्खननात सुती धाग्याने विणलेला कापडाचा तूकडा सापडला. तसेच कापडाचे ठसे देखील काही इतर अनेक वस्तूवर उमटलेले दिसुन येतात. सुत कातण्यासाठी टकळयांचा उपयोग करीत. विणकर सूती व लोकरीचेकापड विणत. विटांची प्रचंड बांधकामे विटा तयार करणे हे महत्त्वाचे कैशल्य असल्याचे सुचित करतात. होडया बनण्याचा सराव होता. मुद्रा मातीच्या वस्तु बनविणे या काही महत्त्वाच्या शिल्पकला होत्या. सुर्वणकार सोने चांदी व मैल्यवान दगडांचे अलंकार बनवीत. सोने चांदी अफगाणिस्तानातून उपलब्ध होत असत.



# मृदभांडी ः






कुंभाराचे चाक वापरण्यात हडप्पन लोक प्रवीण होते. विविध आकृतिबंधात रंगवलेली असंख्य मातीची भांडी संशोधकांना उत्खननात मिळाली. हडप्पातील मातीच्या लाल गेरूच्या रंगाच्या मातीच्या भांडयावर काळा रंगाची नक्षीकाम वृक्षांची व गोलाकार आकृतीबंधांनी सुशोभित केलेली अढळतात. मातीत गाडलेली मातीची भांडी ही बहुदा मौल्यवान अलंकार वस्तु धन संचय करून ठेवण्यासाठी त्याचा वापर करत असावे. मातीची भांडी तयार करण्यासाठी नदीच्याा चिकट मातीचा वापर केला जात असे. भांडयामध्ये पाणी साठवुन ठेवण्यासाठी डांबर स्वरूपाात चिकट पदार्थाचे त्यात आवरण दिले जात असे. छोटी मातीची भांडी रंगीबेरंगी होती. लाल, काळे हिरवे तसेच पिवळया रंगानी रंगवलेली भांडी उपलब्ध होतात. हडप्पा या ठिकाणी सापडर्णाया भांडयावर माणुस व त्याच्या मुलांची चित्र सापडतात. चिवचिव करणारे पक्षी मातीपासून बनवलेल्या पिर्जयात ठेवत असत मातीच्या भांडयांना दिला जाणारा काळा रंग मेग्नीफेरस हीमेटाइड लोह अयस्क पासुन तयार होतो.

## मुद्रा नाणी ः

हडप्पा संस्कृतीतील महान कलात्मक निर्मिती म्हणजे मुद्रा होय. जवळजवळ २000 मुद्रा तेथे आढळल्या. यापैकी बहुसंख्य मुद्रांवर छोटे त्रोटक कोरीव लेख एक शिंगी बैल रेडा वाघ मेंढी बोकड आणि हत्ती ही चित्रे सापडतात. एकटया मोहनजोदाडो मध्ये २00 च्या वर मुद्रा सापडल्या. त्यावर पशुपतीची मुद्रा अढळते






एका नाण्यावर पिपंळाच्या वृक्षाच्या शाखामध्ये निरवस्त्र रूपात देवी चे चित्र रेखाटले आहे. एका नाण्यावर कुबडहीन बैलाचे चित्र आहे. ज्यामध्ये बैलाची शिंग एकास एक जोडलेली आहे. ज्याचे एक शिंगी बैल असे वर्णन केले आहे. दुर्सया प्रकाराच्या मुद्रा हया आयतकार स्वरूपाच्या आहेत. ज्यामध्ये दोरी बांधण्यासाठी छित्रे आहे. मुद्रा बनवण्यासाठी पहिले त्याला करवतीने कापले जाई चाकुने नक्षीकाम करत अतंम स्वरूपात त्याला घासत व गरम करत असत. हडप्पा व मोहनजोदाडो या ठिकाणी अशा स्वरूपाची नाणी अढळतात. झुकाड हया ठिकाणी वतृळाकार नाणी सापडली आहेत. ही नाणी भाजलेल्या मातीपासून तयार केलेली आढळतात. तसेच कुबडदार बैल हे त्याचे वैशिष्य आहे.


## मणी ः

हडप्पा काळातील लोक अलंकार परिधान करत असत.त्या प्रमाणे उत्खननात सापडर्णाया मणीच्या सापडतात. हे मणी गोमेद हया चमकदार दगडापासुन तयार केले जात होतेक्त मोहनजोदाडा हडप्पा चन्हुदडो नागवाडा लेवान गाजीशाह रहमाढेरी बानवली धौलवीर लोथल सुरकोटडा आदी ठिकाणी सापडणाया मणी बनवण्याच्या कारखाण्याच्या उत्खननावरून सिदध होते.

## प्रतिमा ः

हडप्पन कलाकार धातुच्या सुरेख प्रतिमा करी. कांस्य धातुत बनविलेल्या नर्तिकेची प्रतिमा हा त्यातील सर्वात्तम नमुना होय. गळयातील हाराखेरीज ती पुर्णपणे नग्न आहे. स्टेट इटमध्ये बनविलेल्या एका पुतळयाला डाव्या खांद यावर व उजव्या हाताखाली अलंकृत वस्त्र चढवलेले दिसते. त्या वस्त्राचे छोटे बंध डोक्याच्या मागे केसांना बांधावयाच्या फितीने गुंडाळुन व्यवस्थित ठेवलेले होते.



## मातीच्या शोभेच्या मुर्ती ः

सामान्यतः टेराकोटा नावाने ओळखल्या जाणाया भाजलेल्या मातीपासुन तयार केलेल्या पुष्कळ मुर्ती संशोधकांना सापडल्या. खेळणी म्हणुन अथवा पूजनीय प्रतिमा म्हणुन त्यांचा उपयोग केला जात असे. पक्षी कु मेंढया गाई म्हशी व माकडे यांच्या मुर्ती बनवल्या जात असत. पुरूष व स्त्रियांच्या मुर्ती ही तयार केल्या जात. परंतु स्त्रियांच्या मुर्तीची संख्या पुरूषमुर्ती पेक्षा अधिक आहेत. मुद्रा व प्रतिमा यांचे उत्पाादन अतिशय कौशल्याने केले जात असे. परंतु मातीच्या नमुण्यात कलात्मक सफाईचा अभाव दिसतो. दोन प्रकारच्या कलावस्तुंमधील फरक त्या वस्तु वापरणाया वर्गातील फरकाचे सुचन करतो. यांतील पहिला प्रकार मुद्रा व प्रतिमा उच्च वर्गाक डुन वापरला जात असे. दुसरा प्रकार सर्वसामान्य माणसकडुन वापरला जात असे. दगडांच्या कलात्मक वस्तु बनवण्यात हडप्पा संस्कृती मागास होती. प्राचीन इजिप्त व मेसापोटेमिया येथे कलात्मक दगडी शिल्पे मोठया प्रमाणावर आढळतात तशी ती हडप्पा संस्कृतीत ही अढळतात.


## धातुकाम ः

हडप्पन संस्कृतीलाच कांस्यसंस्कृती असे देखील म्हटले जाते. कारण कांस्य या धातुच्या प्रतिमा प्रामुख्याने हडप्पा संस्कृती मध्ये अढळतात. कांस्य हा धातु तांबे व जस्त या दोन धातु पासून मिश्र स्वरूपात तयार होतो. हडप्पा संस्कृतीच सापडर्णाया कांस्य धातुच्या मुर्ती तांब्याच्या तुलनेत कमी प्रमाणात अढळतात. तांबे हा धातु प्रमूख्याने राजस्थान मधील "खेत्री" या ठिकाणी अशुद्ध स्वरूपात अढळते तर जस्त बलुचिस्तानातुन आणले जात असे. कांस्याच्या हत्यारांमध्ये व मुर्तीमध्ये सापडणारे जस्ताचे कमी प्रमाण होते.कांस्य मुर्ती वस्तु बनवणाया कारागिरांचा एक मोठा गट हडप्पन समाजाचा एक महत्त्वाचा भाग बनला होता.

## लिपी ः

प्राचीन मेसोपोटेमियातील लोकांप्रमाणे हडप्पन लोकांनीही लिहिण्याची कला शोधुन काढली. हडप्पन लिपीचा सर्वात जुना नमुना जरी इ.स.१८५३ मध्ये आढळला तरी संपूर्ण लिपीचा शोध १९२३ मध्ये लागला. परंतु अजुन ही ती वाचता आलेली नाही. हडप्पन लिपी ही अक्षरलिपी नसून चित्रलिपी

आहे . ती लिपी वाचता येत नसल्याने हडप्पन लोकांनी कोणत्या स्वरूपात वाङःमयात भर घातलेली आहे हया विषयी मुल्यमापन करणे शक्य होत नाही . त्याचप्रमाणे त्यांच्या कल्पना श्रद्धा समजुती यांबद्दलही काही सांगता येत नाही .



इतर संस्कृती प्रमाणे हडप्पन लोकांनी लांबलचक कोरीव लेख लिहिलेले नाहीत . ब-याचशा कोरीव लेखांची नोंद मुद्रांवर असुन त्यांवर अगदी मोजके शब्द आहेत . धनसंपन्न लोकांनी या मुद्रांचा उपयोग आपली मालमत्ता चिन्हांकित करण्यासाठी व तिची ओळख पटविण्यासाठी केला असावा . दोन बाय दोन इंचाच्या दोन हजारपेक्षा जास्त मुद्रा आपणास मिळाल्या आहेत . त्यातील शब्दांवरून या लिपीत चारशे पेक्षा जास्त अक्षरे असल्याचे समजते . ही लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली जात असावी .

## -हास ः

परिपक्व हडप्पा संस्कृतीचा काळ इ . स . पु २२०० ते इ . स . पु २००० होता असा मानला जातो . या संस्कृतीच्या अस्तित्वाच्या संपूर्ण कालखंडात या संस्कृतीने एकच प्रकारची साधने उपकरण शस्त्रे व घरांची रचना कायम राखली . तसेच या संपुर्णकालावधीत जीवनशैलीही समान राहिलेली दिसते . सर्व नगर रचना तशाच मुद्रा त्याच भाजक्या मातीच्या मूर्ती तीच लांब चेर्टची पाती आढळुन येतात . इ . स . पु ८०० च्या सुमारास हडप्पा संस्कृतीतील हडप्पा व मोहेनजोदाडो ही शहर लुप्त झाली . परंतु हडप्पा संस्कृतीच्या अन्य जागी ती हळुहळु अस्ताला जाऊ लागली . हडप्पा संस्कृतीच्या उगमाप्रमाणेच तिच्या अंताचे स्पष्टीकरण करणे कठीण आहे . हया विषयी संशोधकांमध्ये अनेक मतभेद आहेत . विविध संशोधकांनी मांडलेली विविध कारणे पुढीलप्रमाणे— :

## 1.आर्यांचे आक्रमणः

इतिहासकार मार्टिमर व्हीलर हा म्हणतो की हडप्पा संस्कृती नष्ट करण्यात आर्य लोकांचा वाटा आहे. त्याच्या मते आर्यांनी हडप्पा संस्कृतीतील लोकांवर अचानकपणे आक्रमण केले. ज्याची पूर्वकल्पना हडप्पा संस्कृतीतील लोकांना नव्हती. त्यासाठी तो खालील कारणे देतो.

मोहेंजोदडो येथील अनेक रस्त्यांवर स्त्री पुरुष व बालकांची मृत अवस्थेतील प्रेत सापडली होती. एका खोलीत तेरा स्त्री व पुरुषांचे प्रेत व एका बालकाचे प्रेत सापडले. एकाच्या कपाळावर तलवारीचा वार झाल्याची जखम आढळते. आक्रमणानंतर जे लोक मरण पावले त्यांच्या नातेवाईकांनी मिळेल तसा त्यांचा अंत्यविधी करून त्यांना दफन केले. ह्या दफनविधीत कुठलाही एकसूत्रीपणा दिसून येत नाही. तत्कालीन कालखंडामध्ये मृतांची विल्हेवाट लावून त्यांचे पवित्र राखणे एवढेच त्यात दिसते.

परंतु काही इतिहासकार मार्टिमर व्हीलर यांच्या मताला विरोध करतात. त्यांच्या मते एवढ्या मोठ्या संख्येमध्ये लोक मृत पावली असतील तर त्यांची प्रेते जमिनीच्या एकाच थरावर भेटायला हवी. परंतु तसे येथे दिसत नाही. जमिनीच्या वेगवेगळया थरांवर ती प्रेते आढळून येतात. आर्यांनी जर हडप्पा संस्कृती नष्ट केली असती तर त्या ठिकाणी त्यांनी स्वतःचे साम्राज्य किंवा वसाहत निर्माण केली असती. पण तसे काहीही झालेले दिसत नाही. उलट हा प्रदेश आणखी ओसाड निर्जन झालेला दिसतो.

## 2.नैसर्गिक आपत्तीः

नैसर्गिक आपत्तीमुळे हडप्पा संस्कृती नष्ट झाली असे आपल्याला म्हणता येईल. परंतु कुठल्याही एका नैसर्गिक आपत्तीमुळे हडप्पा संस्कृती नष्ट होणे शक्य नाही. कारण हडप्पा संस्कृतीतील शहरे ही वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया राज्यात भेटतात.

महापूरः

मोहेंजोदडो या शहराच्या विनाशास सिंधू नदीस वारंवार येणारे पूर असे कारण दिले जाते. त्यामुळे हे शहर नष्ट झाले. काही इतिहासकार म्हणतात की सिंधू नदीस वर्षातून दोनदा पूर

यायचा त्यामुळे लोकांनी त्यांची घरे उंचवट्यावर बांधायला सुरुवात केली. परंतु वारंवार पूर येत असल्याने त्यासोबत येणारा गाळ घरांमध्ये घुसू लागला त्यामुळे ही संस्कृती नष्ट झाली असावी असे सांगितले जाते.

### 3.नैसर्गिक साधनांची साधनांची नासाडीः

काही इतिहासकारांच्या मते हडप्पा संस्कृतीतील लोकांनी स्वतःच्या प्रगतीसाठी निसर्गातील संसाधनांचा अतिवापर केला. त्यामुळे त्याची नासाडी झालेली दिसते.

वृक्षतोडः

हडप्पा संस्कृती ही "कांस्ययुगीन संस्कृती" म्हणूनही ओळखली जाते. कांस्य हा धातू तांबे आणि जस्त यांचे एकत्रित मिश्रण आहे. ज्यावेळी तांबे आणि जस्त एकत्र करायचं असेल त्यावेळी त्यांना स्थायुरूपातून द्रवरूपात आणावे लागते. त्यासाठी उष्णता निर्माण करण्याचे काम लाकडांच्या माध्यमातून आगीच्या रूपात केले जात असे. त्यामुळे हे कांस्य तयार करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर लाकडांचा उपयोग होत होता. जी वृक्षतोडीच्या माध्यमातून भेटत होती.

हडप्पा संस्कृतीतील घरे पक्क्या आणि कच्च्या विटांनी बांधलेली दिसतात. कच्च्या विटा पक्क्या करण्यासाठी त्यांना उष्णतेची गरज असते. त्यासाठीही लोकांनी खूप मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड केलेली असावी. त्याचप्रमाणे मातीची भांडी मजबूत करण्यासाठी त्यांना भाजण्यात येत असे. त्याचबरोबर अन्य शिजवण्यासाठी लाकडाचा उपयोग होत होता.

ह्या कारणांसाठी लाकडाचा उपयोग होत असल्याने वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर झाली. व त्यामुळे निसर्गाचा समतोल ढासळला आणि हवामानाचे चक्र बदलले. त्यामुळे येथील संस्कृती नष्ट झाली असावी असे सांगितले जाते.

### 4.सरस्वती नदीचे आटणें

सरस्वती नदीच्या काठावर अनेक नगरे वसलेली होती. परंतु इसवी सन पूर्व 2020 दरम्यान या भागात खूप मोठ्या प्रमाणावर भूकंप झाले. ज्याचा परिणाम सरस्वती नदीला येऊन मिळणाऱ्या उपनद्यांवर झाला. या उपनद्यांची दिशा बदलली गेली. सरस्वती नदीच्या उपनद्या यमुना व

सतलज यांचा सरस्वती नदीला होणारा पाणीपुरवठा कमी झाला. त्यामुळे सरस्वती नदीचे पात्र आटले. आणि त्या ठिकाणचे लोक पाण्याच्या शोधात इतर ठिकाणी स्थलांतरित झाले असावे असेही काही इतिहासकारांचे मत आहे.

5.व्यापारात झालेली घटः

हडप्पा संस्कृतीचा मेसोपेटीमियातील संस्कृतीशी व्यापार चालत होता. परंतु तत्कालीन कालखंडामध्ये मेसोपोटेमियातील अंतर्गत लढाया वाढल्या त्यामुळे तेथील आर्थिक संपन्नता नष्ट झाली. युद्धामुळे सुपीक जमीन शेती करण्यायोग्य राहिली नाही. हडप्पा आणि मेसोपोटेमिया यांच्यातील व्यापार थांबला. हडप्पातील व्यापारी वर्गाचा नाश झाला. कामगारांच्या हातचे काम गेले. त्यामुळे त्यांची संख्या ही कमी झाली. कामगारांचा रोजगार बंद झाल्याने ते शेतीकडे वळाले. शेतीसाठी पावसाचे प्रमाण कमी असल्याने अपेक्षित उत्पादन भेटत नव्हते. त्यामुळे त्यांना स्वतःच्या उपविजेविकेसाठी इतर भागात स्थलांतर करावे लागले त्यामुळे शहरे ओस पडून हडप्पा संस्कृती नष्ट झाली असावी.